# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - नादब्रह्म
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. शारदा मल्लिनाथ तालीकोटी

---

ओंकाराची  महती न्यारी,
नादब्रह्माची किमया सारी ॥ धृ ॥

जीवन माझे झाले रंगीत
जीवनी माझ्या आले संगीत
करावी संगीत साधने ची वारी
नादब्रम्हाची किमया सारी || १ ||

सूर-ताल-लय, मना रिझवती
षड्रिपूंना दूर पळवती
शब्द सुरांची स्वर्गीय रागदारी
नादब्रम्हाची किमया सारी || २ ||

प्रसन्न 'भैरव' सुर्योदयाला
शांत ' यमन ' दिवेलागणीला
चिंता हरतो ' बिलाहारी '
नादब्रम्हाची किमया सारी || ३ ||

दश दिशांत, नवरस साधना
अष्टो प्रहर सप्तसुरांची आराधना
सुर तालांची मेजवानी भारी
नादब्रम्हाची किमया सारी || ४ ||

किलबिल किलबिल पक्ष्यांची
सळसळ सळसळ वृक्षांची
अनाहत नाद हा मनोहारी
नादब्रम्हाची किमया सारी || ५ ||

Anahat Music Therapy

रागदारीचा गंध न मजला
सुर ताल हे वश ना मला
ना कळते मज ' दरबारी '
नादब्रम्हाची किमया सारी || ६ ||

शिव परमात्मा, सौख्यप्रदाता
संगीत कलेचा तोच त्राता
सामवेदाची देन ही प्यारी
नादब्रम्हाची किमया सारी || ७ ||

Anahat Music Therapy